# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात संयुक्त सहविचार सभा संपन्न








शिक्षण देणं हे विद्यापीठाचे व संलग्नित महाविद्यालयांचे काम आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण व्यवस्थेत फार मोठे बदल झाले आहे. या धोरणानुसार गुणवत्तापूर्ण व कौशल्यपूर्ण शिक्षण विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळावे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरूडॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन, संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यापीठ प्रशासनामध्ये समन्वय स्थापित व्हावा व प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाविषयक माहिती आणि कार्यालयीन कामांमध्ये सुसूत्रता व गतिमानता निर्माण व्हावी, याहष्टीने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य तसेच इतर उपक्रम जसे राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास, आय.क्यु.ए.सी. संचालित करणारे प्राध्यापक व समन्वयक यांची संयुक्त सहविचार सभा विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरूडॉ. विजयकुमार चौबे, अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे उपाध्यक्ष श्री वसंत घुईखेडकर उपस्थित होते.

सहविचार सभेत प्राचार्य व संस्थाचालकांनी विचारलेल्या प्रश्नांना माहिती देतांना कुलगुरूपुढे म्हणाले, एन.ई.पी. मध्ये शिक्षकांचा सहभाग वाढणार आहे. पदवी घेतांना विद्यार्थ्याला आवडीचा विषय सुद्धा घेण्याची सोय यामध्ये करण्यात आली आहे. सी.एच.बी. मान्यतेकरीता एकदिवसीय मेळावा घेण्यात येईल व समस्यां सोडविण्यात येईल. टप्प्याटप्प्याने परीक्षा मूल्यांकन केंद्राचे विकेंद्रीकरण केल्या जाईल, ऑनलाईन शैक्षणिक अंकेक्षण, प्रत्येक महाविद्यालयांनी नॅक केलेच पाहिजे, बिंदू नामावलीसाठी मेळावा, नॉमिनक्लेचर बदलण्यासाठी अजेंडा राबविणार, परीक्षा फॉर्म नव्याने डिझाईन करणार, वाढीव प्रवेश मागणी नियमानुसार पूर्ण करण्यात येईल, असे सांगितले.